पिकावरील कीड-रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प
कीटकशास्त्र विभाग वनामकृवि, परभणी
इ-मेल- entomkv@gmail.com

जा.क्र. जिझेडई/क्रॉपसॅप/५८४/२६ दिनांक: २७.१०.२०२६

आवाहन क्र. १५

तुर पिकातील शेंगा पोखरणाऱ्या अळयाचे व्यवस्थापन

डॉ. अनंत लाड
सहाय्यक प्राध्यापक

डॉ. पुरुषोत्तम नेहरकर
विभाग प्रमुख

डॉ. राजरतन खंदारे
संशोधन सहयोगी

तुर पीक हे महाराष्ट्रातील एक प्रमुख कडधान्य पीक आहे. सद्य परिस्थितीत तूर पीक फुले व शेंगाच्या अवस्थेत असून बऱ्याच ठिकाणी तुर पिकावर शेंगा पोखरणाऱ्या अळयाचा प्रादुर्भाव दिसून येत आहेत. शेंगा पोखरणाऱ्या अळया मध्ये प्रामुख्याने शेंगा पोखरणारी अळी, पिसारी पतंग, पाने व फुले जाळी करणारी अळी व शेंगमाशी ह्या किडी आहेत. या किडिंमुळे जवळपास ७०% पेक्षा जास्त नुकसान होऊ शकते. त्यामुळे या कीडींची वेळीच ओळख करुन एकात्मिक व्यवस्थापन करने गरजेचे आहे.

शेंगा पोखरणारी अळी : ही कीड हिरवी अळी, घाटेअळी, अमेरीकन बोंडअळी अशा नावाने प्रचलीत असून मोठया प्रमाणात तुरीचे नुकसान करते. ही किड बहुभक्षी असून जवळपास २०० पिकांवर (तुर, हरभरा, कापूस, सोयाबीन, ज्वारी, भेंडी, टोमॅटो, ई.) प्रादुर्भाव दिसून येतो. अंडयातून बाहेर निघालेली लहान अळी सुरवातीस तुरीची कोवळी पाने खाते. पिकास फुलोरा लागल्यावर कळया, फुले यावर उपजिविका करते. नंतर शेंगाना अनियमित आकाराने मोठे छिद्र पाडून आत शिरते. अळी तिचे अर्धे शरिर बाहेर व अर्धे शेंगेमध्ये खुपसून आतील कोवळी दाणे खातात. मोठया अळया शेंगाना छिद्रे करुन आतील दाणे पोखरुन खातात. अशा प्रकारे एक अळी जवळपास ३० ते ४० शेंगाना नुकसान पोहचवुन अळी अवस्था पुर्ण करते. ढगाळ वातावरणात या कीडीच्या वाढीस पोषक असून जास्त प्रादुर्भाव असल्यास २५ ते ७० टक्क्यापर्यंत नुकसान होऊ शकते.

पाने व फुले जाळी करणारी अळी / ठिपक्याची शेंगा पोखरणारी अळी (मारुका): या किडीचा प्रादुर्भाव साधारणतः फुलोरा येण्याच्या अवस्थेत होतो. ही अळी पाने, फुलकळया व शेंगा यांचा एकत्र गुच्छ तयार करुन त्यात लपुन बसते आणि उदर्निवाह करते. वाढ होणारे कोवळे शेंडे, पाने एकमेकांना चिकटल्याने खोडाची वाढ खुंटते व नुकसान होते.

पिसारी पतंग: या अळीचा प्रादुर्भाव साधारणतः पावसाळा संपल्यावर मोठया प्रमाणावर होतो. अंडयातुन बाहेर पडलेली अळी सुरुवातीला कळया, फुले व शेंगाना छिद्र पाडुन दाणे खाते. पुर्ण वाढ झालेली अळी प्रथम शेंगेचा पृष्ठभाग खरबडुन खाते व नंतर बाहेर राहून आतिल दाण्यावर उपजिविका करते.

शेंगमाशी : सुरुवातीस शेंगमाशीच्या प्रादुर्भावाचे कोणतेही लक्षण शेंगेवर दिसत नाही. परंतु जेव्हा वाढ झालेली अळी कोषावस्थेत जाण्यापूर्वी शेंगेला छिद्र पाडते व त्या छिद्रातून माशी बाहेर पडते तेव्हा नुकसानीचा प्रकार लक्षात येतो. अळी शेंगेत प्रवेश करुन अर्धवट दाणे खाते तसेच दाण्यावर नागमोडी खाचा तयार होतात. यामुळे बुरशीची वाढ होते व दाणे कुजतात.

एकात्मिक व्यवस्थापन :

१. पाने व फुलांची जाळी करणारी अळीची प्रादुर्भावग्रस्त जाळी गोळा करून अळीसहीत नष्ट करावीत तसेच शेंगा पोखरणारी अळीच्या मोठया अळया हाताने वेचून त्यांचा नायनाट करावा.
२. पिकामध्ये निरिक्षणासाठी एकरी २ व मोठ्या प्रमाणात नर पतंग पकडण्यासाठी ८ ते १० कामगंध सापळे पिकाच्या वर एक फूट उंचीवर लावावेत.
३. शेतामध्ये पक्षी बसण्यासाठी २० ते २५ हेक्टरी पक्षी थांबे उभारावेत.
४. ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी किंवा अझाडिरॅक्टिन ३०० पीपीएम ५ मि.ली. किंवा बॅसिलस थुरिन्जिएन्सिस कुर्सटाकी प्रजाती १.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून फवारणी करावी.
५. एच.ए.एन.पी.व्ही. विषाणू ५ मिली प्रति १ लिटर पाण्यातून मिसळून.
६. मर रोगाच्या नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा व्हिरीडी या जैविक बुरशीनाशकाची ५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी.
७. जर कीडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीच्या पातळीच्यावर आढळून आल्यास खालील कीटकनाशकांची आलटून पालटून **प्रति लिटर पाण्यातून फवारणी** करावी.

- **सर्व शेंगा पोखरणा-या व खाणा-या अळया :** क्लोरान्ट्रानिलीप्रोल ४७.८५% एससी ०.१ मिली किंवा इंडॉक्साकार्ब १४.५% एससी ०.६६ मिली किंवा इंडॉक्साकार्ब १५.८% ईसी ०.६६ मिली किंवा नोव्हाल्युरॉन ५.२५%+इंडॉक्साकार्ब ४.५% एससी १.६५ मिली.
- **शेंगा पोखरणारी अळी :** फ्लुबेंडायमाइड ३९.३५% एससी ०.२ मिली किंवा इमामेक्टिन बेन्झोएट ५% एसजी ०.४४ ग्रॅम किंवा क्लोरान्ट्रानिलीप्रोल १८.५०% एससी ०.३ मिली किंवा क्लोरान्ट्रानिलीप्रोल ९.३% + लाम्ब्डा-सायहॅलोथ्रिन ४.६% झेडसी ०.४ मिली.
- **शेंगा पोखरणारी अळी व शेंगमाशी :** क्लोरान्ट्रानिलीप्रोल १८.५०% एससी ०.३ मिली किंवा ल्युफेन्युरॉन ५.४% ईसी १.२ मिली किंवा क्विनालफॉस २५ % ईसी २.८ मिली किंवा लांबडा सायहॅलोथ्रिन ५% ईसी १ मिली.
- **पाने व फुले जाळी करणारी अळी (मारुका) व शेंगा पोखरणारी अळी :** स्पायनेटोराम ११.७ % एससी ०.७५ मिली किंवा ब्रॉफ्लॅनिलाईड ३०० % एससी ०.०८ मिली किंवा क्लोरफेनापायर २४० % एससी १.६ मिली किंवा आइसोसायक्लोसेरॅम ९.२ % डीसी १ मिली.
- **नोट :** वरील सर्व कीटकनाशकाचे प्रमाण साध्या/ नॅपसॅक पंपासाठी आहे पेट्रोल पंपासाठी हे प्रमाण तीन पट वापरावे. फवारणीसाठी स्वच्छ पाणी वापरावे. वरीलपैकी प्रत्येक फवारणीसाठी केवळ एकाच कीटकनाशकाची फवारणी करावी. शेतात कीटकशकांचा वापर करतांना हातमोजे, तोंडावर मास्कचा, डोळ्यावर चष्माचा वापर करावा व सुरक्षितेची योग्य ती काळजी घ्यावी.

समन्वयक अधिकारी
क्रॉपसॅप प्रकल्प तथा सहाय्यक प्राध्यापक
कीटकशास्त्र विभाग,
वनामकृवि, परभणी

समन्वयक अधिकारी
क्रॉपसॅप / हॉर्टसॅप
वनामकृवि, परभणी
कीटकशास्त्र विभाग,
वनामकृवि, परभणी

प्रत :

१. मा. संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव
२. मा. कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, म.रा., पुणे यांना माहितीस्तव
३. मा. विभागीय कृषि सहसंचालक, लातूर/छ.संभाजीनगर यांना कार्यवाहीस्तव

तुर पिकातील शेंगा पोखरणाऱ्या अळयाचे व्यवस्थापन





शेंगा पोखरणारी अळी




ठिपक्याची शेंगा पोखरणारी अळी




पिसारी पतंग अळी




शेंग माशी अळी